3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६२ वा • शुक्रवार, ता. ०५ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## महायुतीत फूट? चव्हाणांच्या हालचालींवरून इशारा

**मुंबई । रयत समाचार**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डोंबिवली-कल्याण परिसरातील फोडाफोडीचे राजकारण चांगलेच चव्हाट्यावर आले असून, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शिवसेना शिंदे गटातील दोन महत्त्वाच्या नेत्यांना गळाला लावल्यानंतर महायुतीतील अंतर्गत तणाव उफाळून आला आहे. ३ नोव्हेंबर रोजी अभिजीत थरवळ आणि विकास देसले यांनी चव्हाणांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्तीयांच्या या हालचालीमुळे शिंदे गटात नाराजीचा सूर अधिक ठळक झाला असून, महायुतीतील एकजुटीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी चव्हाणांवर थेट टीका करत कडक इशारा दिला. ''प्रदेशाध्यक्ष म्हणून चव्हाणांनी महाराष्ट्राकडे लक्ष द्यावे; एखाद्या मतदारसंघात फाटाफूट घडवून आणणे योग्य नाही. आमच्या कार्यकर्त्यांना त्रास होणार असेल, तर आमच्याकडूनही उत्तर मिळेलच,'' असे शिरसाट म्हणाले. ते पुढे म्हणाले की, ''लोकांना महायुती हवी आहे, पण जर अशाप्रकारे आमचेच कार्यकर्ते फोडले जात असतील, तर भविष्यात आम्हाला स्वतंत्रपणे निवडणुका लढवाव्या लागतील.'' डोंबिवलीतील शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनीही रवींद्र चव्हाणांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. ''चार वेळा आमदार, मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष असूनही आपल्या स्वतःच्या मतदारसंघात गड उभा करता आला नाही, तर अशा नेत्याला प्रदेशाध्यक्षपद कोणत्या आधारावर दिले?'' असा सवाल शिंदे गटाने केला. शिवसेना-भाजप युती ही अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि बाळासाहेब ठाकरे यांनी मजबूत केली होती, हे लक्षात ठेवावे, अशी टीकाही त्यांनी चव्हाणांवर केली. डोंबिवली आणि कल्याण परिसरातील या फोडाफोडीमुळे महायुतीतील ऐक्यावर सावट निर्माण झाले असून, आगामी निवडणुकांपूर्वी दोन्ही पक्षांनी अधिक संयमाने वाटचाल करण्याची गरज असल्याचे संकेत या घडामोडींमधून मिळत आहेत.

## डीजीआयपीआरतर्फे दोन माहितीपट, चित्रपटाचे ऑनलाईन प्रसारण


### महापरिनिर्वाणदिनी बाबासाहेबांना अभिवादन

**मुंबई । रयत समाचार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येत्या शनिवारी ता.६ डिसेंबर २०२५ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (DGIPR) तर्फे बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आधारित दोन माहितीपट आणि एक चित्रपट समाजमाध्यमांच्या प्लॅटफॉर्मवर प्रसारित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून महासंचालनालयातर्फे डॉ. आंबेडकरांना आदरांजली अर्पण केली जाणार आहे. महासंचालनालयाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, 'महापुरुष डॉ. आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वाजता होणार आहे. 'बाबासाहेब आंबेडकर' हा माहितीपट दुपारी १ वाजता पाहता येईल तर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता करण्यात येणार आहे. नागरिकांना बाबासाहेबांचे कार्य, विचार आणि मानवतावादी तत्त्वज्ञान अधिक जवळून जाणून घेण्याची संधी या प्रसारणामुळे उपलब्ध होणार असल्याचे महासंचालनालयाने सांगितले आहे. हे सर्व कार्यक्रम च्या अधिकृत समाजमाध्यमांवर पाहता येतील. समाजमाध्यमांच्या लिंक एक्स : https://x.com/MahaDGIPR , फेसबुक : https://www.facebook.com/MahaDGIPR , यूट्यूब : https://www.youtube.co/MAHARASHTRADGIPR



## भारताला मोदींचा अभिमान असला पाहिजे, पुतिनांचे गौरवोद्गार



**मॉस्को । रयत समाचार**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या अधिकृत दौऱ्यावर येण्याआधी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाबद्दल मोठी प्रशंसा करताना दिसले. अमेरिकेने भारतावर लादलेल्या टॅरिफ संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पुतिन म्हणाले की नरेंद्र मोदी हे दबावात येणारे नेते नाहीत आणि जगाने भारताचे ठाम धोरण स्पष्टपणे पाहिले आहे. देशाला आपल्या पंतप्रधानांचा अभिमान असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. इंडिया टुडे दिलेल्या मुलाखतीत पुतिन यांनी भारत-रशिया संबंध, द्वीपक्षीय सहकार्य, अमेरिका-भारत-रशिया तणावसंबंधी अनेक मुद्द्यांवर मोकळेपणाने भाष्य केले. भारत आणि रशियामधील ९० टक्क्यांहून अधिक व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण होत असल्याचे सांगून ही भागीदारी विश्वासाची आणि सातत्यपूर्ण असल्याचे त्यांनी म्हटले. भारताच्या विकासाचाही पुतिन यांनी विशेष उल्लेख केला. भारताने स्वातंत्र्यानंतरच्या मर्यादित कालावधीत केलेला अद्भुत विकास जगासाठी आदर्श असल्याचे ते म्हणाले. रशिया आणि भारत या दोन्ही देशांमध्ये संरक्षण, व्यापार, ऊर्जा, अवकाश, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्षमता असून आगामी भेटीत या विषयांवर विस्तृत चर्चा होणार असल्याचे त्यांनी सूचित केले. पुतिन यांनी हेही सांगितले की ते भारत दौऱ्याबद्दल उत्सुक आहेत आणि नरेंद्र मोदी यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन सहकार्य आणखी दृढ करण्यास उत्सुक आहेत. व्लादिमीर पुतिन यांचा भारत दौरा हा दोन दिवसांचा असून ४ डिसेंबर रोजी ते नवी दिल्लीत आगमन करणार आहेत. ५ डिसेंबर रोजी राष्ट्रपती भवनातील स्वागत सोहळा, राजघाटावर महात्मा गांधींना अभिवादन, हैदराबाद हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत महत्त्वपूर्ण चर्चा, संयुक्त पत्रकार परिषद आणि सायंकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट असा त्यांचा दिवसाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. रात्री ते रशियाकडे परतणार आहेत. रशिया-युक्रेन युद्धानंतर पुतिन यांचा हा पहिलाच भारत दौरा असून त्यामुळे या भेटीकडे आंतरराष्ट्रीय स्तरावरही लक्ष लागले आहे.

## युएन वुमेन इंडियाच्या 'शी लिड्स- ३' कार्यशाळेत सत्यभामा सौंदरमल यांचा सहभाग

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

येथे युएन वुमेन इंडिया आयोजित दोन दिवसीय 'शी लिड्स-३' राष्ट्रीय कार्यशाळेत ता.४- ५ डिसेंबर रोजी देशभरातील ३० उभरत्या महिला नेत्यांमध्ये स्थान मिळाल्याचा सन्मान सत्यभामा सौंदरमल यांनी प्राप्त केला. या कार्यशाळेत सहभागी होताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, महिलांच्या नेतृत्वक्षमता, नेटवर्क आणि निर्णयक्षमता अधिक बळकट करण्यासाठी हा मंच अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

सौंदरमल पुढे म्हणाल्या, माझ्या कार्याची दखल घेतल्याबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल मी युएन वुमेन इंडियाची मनःपूर्वक आभारी आहे. या मंचाच्या माध्यमातून महिलांना नवे दृष्टिकोन, मार्गदर्शन आणि नेतृत्वक्षमतेसाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते कार्यशाळेत विविध क्षेत्रातील महिला प्रतिनिधींनी सहभाग नोंदवत महिला नेतृत्व, समता, सामाजिक हस्तक्षेप, निर्णय प्रक्रिया आणि सक्षमीकरण या विषयांवर सखोल चर्चा केली. महिलांच्या नेतृत्व विकासासाठी युएन वुमेन इंडिया तर्फे राबविण्यात येत असलेल्या 'शी लिड्स' कार्यक्रमाच्या तिसऱ्या टप्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या निवडीमुळे सत्यभामा सौंदरमल यांचे नेतृत्व आणि सामाजिक कार्याला नवी दिशा मिळाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक तसेच निवडीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.




### नोंदणी व मुद्रांक विभागाचा आकृतीबंध; ९६५ पदनिर्मिती

मुंबई । रयत समाचार

राज्य शासनाने नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी दिली असून विभागातील मंजूर पदसंख्या आता ३,९५२ झाली आहे. महसूल व वन विभागाच्या ४ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमित निर्णयानुसार, पूर्वीच्या ३,०९४ पदांपैकी १०७ पदे रद्द करून ९६५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत, अशी माहिती नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे यांनी दिली. विभागाची आकृतीबंध सुधारणा सन २०१६ पासून प्रलंबित होती

## विधानसभा-लोकसभा केले मतदान, माजी नगरसेवकाचे नाव यादीतून गायब

**ठाणे। रयत समाचार**

शहरात मतदारयादीतील घोळ पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून यावेळी थेट माजी नगरसेवक सुधीर भगत यांच्याच नावाची वगळणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. विशेष म्हणजे, भगत यांनी गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीत आपल्या प्रभागातून प्रत्यक्ष मतदानाचा हक्क बजावला आहे, हे अधिकृत नोंदीवर असूनही यंदाच्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम करण्यात आलेल्या मतदारयादीत त्यांचे नाव गायब असल्याचे दिसून आले. राज्यातील अनेक ठिकाणी दुबार, तिबार नोंदणी, चुकीचा पत्ता किंवा मतदारसंघच बदलल्याच्या तक्रारी यापूर्वी नोंदल्या गेल्या असल्या तरी माजी जनप्रतिनिधीचे नावच वगळले जाणे हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे. नोव्हेंबरमध्ये ऑनलाइन तपासणी करताना स्वतःचे नाव यादीत नाही हे लक्षात आल्यानंतर सुधीर भगत यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेत तक्रार दाखल केली. चौकशीअंती प्रशासनाने मान्य केले की अनवधानाने ही वगळणी झाली असून, यादीतील ''सुधीर भगत'' या नावाच्या दोन व्यक्तींमध्ये गोंधळ झाल्याचे नमूद केले. आश्चर्याची बाब म्हणजे, संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून कोणताही अहवाल न देता नमुना क्रमांक ७ अर्जावरून ही वगळणी करण्यात आली, तसेच अर्जावरील स्वाक्षरीही भगत यांची नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांना कोणतीही नोटीस न देता त्यांचे म्हणणे मांडण्याची संधीही नाकारण्यात आली, याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. जिल्हा प्रशासनाने चौकशीनंतर चूक मान्य करताना सांगितल, सुधीर रामचंद्र भगत या नावाचे दोन वेगवेगळे नागरिक असल्याने गोंधळ झाला आणि त्यात माजी नगरसेवकांचे नाव चुकीने वगळण्यात आले. १९९५ पासून विधानसभा निवडणूक २०२४ पर्यंत त्यांचे नाव सातत्याने मतदारयादीत असल्याचे नोंदीत असल्याने त्यांच्या अपीलावरील विलंबदेखील माफ करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे मुंब्रा परिसरातील नगरसेवक आणि स्थानिक नागरिक यांच्यात प्रशासन व निवडणूक आयोगाच्या कारभाराबद्दल नाराजी वाढली. अशीही चर्चा स्थानिक पातळीवर सुरू झाली



## एआयमुळे वेग आणि गुणवत्तेत मोठी भर- ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस




**मुंबई । रयत समाचार**

माध्यमांशी संवाद साधताना काळानुरूप नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे अत्यावश्यक बनले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (), विविध डिजिटल ॲप्स, 'टेक्स्ट-टू-व्हिडिओ' प्लॅटफॉर्म, चॅटजीपीटीसारखी साधने यांचा उपयोग केल्यास प्रसिद्धी साहित्य तयार करण्याचा वेग आणि गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढते, असे मत ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस यांनी व्यक्त केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित विशेष चर्चासत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाला संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक (वृत्त) वर्षा आंधळे, तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सम्राट फडणीस म्हणाले, अनेक इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये डिजिटल अँकर्सचा वापर वाढत आहे. यामुळे अचूकता वाढते, मनुष्यबळाची बचत होते आणि वेळेची बचत होते. ते पुढे म्हणाले, सोशल मीडियावर वेगाने पसरत असलेल्या दिशाभूल करणाऱ्या माहितीनंतर आगामी दशकात फॅक्ट-चेकिंगची गरज मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. यासाठी आधुनिक विश्लेषण प्रणाली, डिजिटल ट्रॅकिंग तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर विभागांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. कार्यक्रमात उपस्थित अधिकाऱ्यांनी विविध विषयांवर फडणीस यांच्याशी चर्चा केली. यावेळी संचालक (माहिती) गोविंद अहंकारी यांनी फडणीस यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रसंचालन विभागीय संपर्क अधिकारी संध्या गरवारे यांनी केले, तर आभार वरिष्ठ सहायक संचालक काशीबाई थोरात यांनी मानले.

## 'मागेल त्याला सौर कृषिपंप' महाराष्ट्राचा विक्रम

**मुंबई । शफीक बागवान**

'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेअंतर्गत महाराष्ट्राने मोठी कामगिरी करत जागतिक विक्रम नोंदवला आहे. महावितरणने एकाच महिन्यात तब्बल ४५,९११ सौर कृषिपंप बसवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये आपली नोंद केली आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना अत्यल्प खर्चात सौरऊर्जेवर चालणारा संपूर्ण कृषिपंप संच उपलब्ध होत असून राज्यातील सिंचन व्यवस्थेत मोठा बदल घडत आहे. प्रधानमंत्री कुसुम योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३० टक्के आणि राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि संपूर्ण कृषिपंप संच मिळतो. तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी हा हिस्सा फक्त पाच टक्के आहे. राज्यात साडेदहा लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून यामुळे कृषिपंपासाठी वीजजोडणीची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. या योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल विकसित केले आहे. शेतकऱ्याच्या अर्जाची मंजुरी, हिस्सा भरल्यानंतर एजन्सी निवड, महावितरणशेतकरीएजन्सी यांची संयुक्त पाहणी, कार्यादेश आणि पंप बसविणे अशी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकरीत्या राबवली जाते. सौर पॅनल्समधून तब्बल २५ वर्षे वीजनिर्मिती होते. त्यामुळे या कालावधीत शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल भरावे लागत नाही. तसेच पंप बसविणाऱ्या एजन्सींवर देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी देण्यात आली असून शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण सेवा मिळणार आहे.



## औद्योगिक उभारणीला चालना

### 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२६' तयारी जोरात

**नवी दिल्ली । रयत समाचार**

मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (MASSIA) तर्फे येत्या ८ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान औरिक सिटी, डीएमआयसी, शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२६'बाबत तयारीला वेग आला आहे. महाराष्ट्र सदनाचे निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड यांची MASSIA चे उपाध्यक्ष राहुल मोगले यांनी भेट घेऊन प्रदर्शनाविषयी सविस्तर चर्चा केली. ''Where Potential Meets Opportunities' या संकल्पनेवर आधारित हे महत्त्वाचे औद्योगिक प्रदर्शन मराठवाडा तसेच महाराष्ट्रातील कृषी, उत्पादन, तंत्रज्ञान, स्टार्टअप, लॉजिस्टिक्स आणि उदयोन्मुख उद्योग क्षेत्रांसाठी एक भव्य व्यासपीठ ठरणार आहे. महाराष्ट्र शासन, MSME विभाग, MIDC आणि AURIC यांच्या पाठबळाने होणाऱ्या या मेगा इव्हेंटमध्ये देश-विदेशातील हजारो उद्योजक, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञ सहभागी होणार.

### कोपरगाव निवडणूक सुधारित कार्यक्रम जाहीर

**कोपरगाव । रयत समाचार**

नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी सुधारित कार्यक्रम जाहीर झाला असून मतदानाची नवी तारीख २० डिसेंबर २०२५ निश्चित करण्यात आली , अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश सावंत यांनी दिली. नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम तारीख १० डिसेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत असून चिन्ह वाटप ११ डिसेंबर सकाळी ११ वाजता होणार आहे. मतदान २० डिसेंबर रोजी सकाळी ७:३० ते सायं. ५:३० या वेळेत ६९ मतदान केंद्रांवर पार पडेल. तर मतमोजणी २१ डिसेंबर सकाळी १० वाजता सेवानिकेतन येथे होणार आहे.

## भाजपच्या १७५ जागांवरून काँग्रेसचा आरोप

### ईव्हीएममध्ये घोळ नसेल तर निकाल २० दिवस का लांबवला?

**मुंबई । रयत समाचार**

मुंबई येथे नगरपालिका निवडणुकांच्या निकालाचा गोंधळ वाढत असताना काँग्रेसने निवडणूक आयोगावर आणि राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. मतदान २ डिसेंबरला पार पडले असले तरी निकालाची तारीख ३ डिसेंबरवरून थेट २१ डिसेंबरपर्यंत ढकलल्यामुळे विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या विलंबावर तीव्र प्रतिक्रिया देत भाजपवर थेट आरोप केला आहे. त्यांनी सांगितलं की, राज्यातील २६८ पैकी १७५ जागा भाजप जिंकणार हे आधीच कसं सांगितलं जातं? कोणते दिवे लावलेत? जर खरोखर १७५ जागा आल्या तर ते ईव्हीएम हॅक करून निवडणुका जिंकण्याचा पुरावा असेल. ते पुढे म्हणाले की अनेक ठिकाणी स्ट्राँग रुमजवळ संशयास्पद हालचाली दिसत आहेत, जॅमर आणि लाइव्ह स्क्रीनची मागणी असूनही निवडणूक आयोग ते देण्यास तयार नाही. वडेट्टीवार यांनी आरोप केला की काही ठिकाणी ''एक मताला २० हजार रुपये'' अशी व्यवहाराची भाषा सत्ताधारी नेते बोलताना ऐकू आली. निवडणुका मुद्दाम लांबणीवर टाकून घोळ करण्याचा प्रयत्न होतोय, असेही त्यांनी म्हटले. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी १४ डिसेंबर रोजी दिल्लीत मोठा मोर्चा काढण्याची घोषणा केली.लोकशाहीचं नुकसान होत असताना मुख्यमंत्री स्वतः निवडणूक आयोगाला पत्रही लिहीत नाहीत.

### डॉ. विखे महाविद्यालयात संविधान कार्यशाळा

# संविधान हा भारताचा आत्मा- दादासाहेब काजळे

**अहमदनगर । विजय मते**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने संविधानाच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त संविधान अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. एनएसएस युनिटतर्फे आयोजित या एकदिवसीय संविधान कार्यशाळेची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेच्या सामूहिक वाचनाने झाली. लोकशाही मूल्यांची जाणीव आणि संविधानाबद्दल अभिमान निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.



कार्यशाळेचे प्रमुख वक्ते विद्या भारतीचे सहसचिव (पश्चिम महाराष्ट्र प्रांत) दादासाहेब काजळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संविधान निर्मिती प्रक्रिया, मसुदा समितीचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे द्रष्टेपण आणि संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत मूल्यांचे त्यांनी सोप्या शब्दांत सविस्तर स्पष्टीकरण केले. डिजिटल युगातील आव्हानेही त्यांनी विशद करत ''संविधान हा भारताचा आत्मा आहे'' असे प्रतिपादन केले.

कार्यशाळेत प्राचार्य डॉ. आर. आर. नवथर, आ. ब. गरवारे महाविद्यालयाचे निरीक्षक डॉ. कुंडलिक पारधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दिवसभर एनएसएसतर्फे संविधान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले गेले. जनजागृती रॅलीत स्वयंसेवकांनी संविधान मूल्यांबाबत घोषणांद्वारे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली. संविधानातील विविध कलमे, अधिकार आणि कर्तव्यांवर आधारित पोस्टर्स व माहितीफलकांचे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमात प्रतिक बोरुडे, महेश जगताप, स्नेहा आहिरे, हर्ष पाटील, रोहन नवगिरे, चैतन्य बारी, ऋषिकेश कानडे, अभिनव नायर, साक्षी मालुंजकर, पुनम थोरात, क्रांती दुग्गड, संस्कृति दिवटे, शुभम शिरसाठ, नवनाथ रोहकले आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात सादर करण्यात आलेला रस्त्यावरचा नाट्यप्रयोग विशेष उल्लेखनीय ठरला. प्रा. गणेश डहाणे लिखित आणि श्री. राम पठारे दिग्दर्शित या नाटकातून भ्रष्टाचार, सामाजिक समता, कायद्याचे पालन आणि नागरिकांची कर्तव्ये यांसारख्या संवेदनशील विषयांवर प्रभावी भाष्य करण्यात आले. कृष्णकांत त्रिमुखे यांनी साकारलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवून गेली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. मंदार बिडवे यांनी केले. विविध विभागातील विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी ठरल्याचे त्यांनी सांगितले. समारोप राष्ट्रगीताने झाला.

या कार्यक्रमाच्या यशात प्रा. मंदार बिडवे, डॉ. समशेर शेख, प्रा. एस. बी. जोशी, प्रा. सुनील मांढरे, प्रा. गणेश डहाणे, प्रा. एम. एच. नेरकर, प्रा. नाना मुळीक, प्रा. आर. एन. देवराई, प्रा. एन. ए. पोंदे, डि. बी. ठाणगे, डॉ. अनिकेत विखे तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांचा मोठा सहभाग होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवथर, विभागप्रमुख, शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे डायरेक्टर (टेक्निकल) प्रा. सुनील कल्हापुरे, सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, सीईओ डॉ. सुजय विखे पाटील तसेच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

# साहेबराव आवारे प्रतिष्ठानतर्फे वारकऱ्यांचा सन्मान



**नगरतालुका । रयत समाचार**

सद्गुरु श्री साहेबराव आवारे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त जेऊर येथे आयोजित कार्यक्रमात वारकरी परंपरा, साहित्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. प्रतिष्ठानतर्फे प्रतिष्ठित वारकऱ्यांचा ग्रंथसंपदा व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सन्मानित वारकऱ्यांमध्ये मच्छिंद्र तवले महाराज, रघुनाथ तोडमल महाराज, सुदाम दारकुंडे महाराज, रमेश चौधरी महाराज, चांगदेव आठरे महाराज आणि शरद नाना तवले महाराज यांचा समावेश होता.

कार्यक्रमात अहिल्यानगर अक्षर साहित्य प्रतिष्ठानतर्फे साहित्य पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले. कार्यक्रमास पुरस्कार निवड समितीचे सदस्य कवी प्रा. शशिकांत शिंदे, डॉ. संजय बोरुडे, अक्षर साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धिनाथ मेटे, उपाध्यक्ष व कार्याध्यक्ष प्रा. हेमलता पाटील, तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप शेटे, सचिव नवनाथ मगर, ॲड. विनायक तोडमल, प्रवीण पवार, ज्योतिष अभ्यासक संतोष घोलप, साहित्यिक सचिन चोभे, आत्मनिर्धारचे महादेव गवळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. संजय कळमकर होते. आपल्या मनोगतात ते म्हणाले की, संत साहित्य आणि वारकरी परंपरा या धार्मिकतेपलीकडे जाऊन मानवी जीवन उन्नतीचे तत्त्वज्ञान शिकवतात. आवारे यांचे साहित्यिक, सामाजिक आणि अध्यात्मिक योगदान अमूल्य असून त्यांच्या नावाचा पुरस्कार साहित्य विश्वात मानाचा समजला जातो. ''समाजात 'कर्ते सुधारक' आणि 'बोलके सुधारक' अशी दोन मंडळी असतात; त्यापैकी आवारे हे खरे 'करेते सुधारक' आहेत,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. अमृतमहोत्सवी कार्यक्रमाने जेऊरमध्ये श्रद्धा, साहित्य आणि संस्कृतीचा सुंदर संगम घडवून आणत सर्व उपस्थितांना समृद्ध अनुभव दिला.

# पीए इनामदार इंग्लिश शाळेत झिलस स्पोर्टस मीट उत्साहात संपन्न

**अहमदनगर । आबीद खान**

इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या पी.ए. इनामदार स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित झिलस स्पोर्टस मीट २०२५ वाडिया पार्क मैदानावर उत्साहात पार पडली. खेळ हा शिस्त, संघभावना आणि कठोर परिश्रम शिकवणारा जीवनाचा खरा गुरू असून शरीर तंदुरुस्त, मन प्रसन्न ठेवण्यासाठी खेळ अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन संस्थेचे खजिनदार डॉ. खालीद शेख यांनी केले.

खेळात जिंकणे हरणे गौण असून सतत प्रयत्न करणारा विद्यार्थीच खरा विजेता ठरतो. या स्पर्धांमधून अनेक नवे खेळाडू घडतील व ''खेळत राहा पुढे जात राहा'' हा संदेश विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असेही ते म्हणाले.




**२०० मीटर मुलांचे रनिंग निकाल :-**
प्रथम तांबोळी साऊद शहबाज, द्वितीय शेख तौहिद साजिद, तृतीय शेख मुसेब समीर

**२०० मीटर मुलींचे रनिंग निकाल :-**
प्रथम शेख अर्शिन साजीद, द्वितीय कुरेशी सुफिया अब्दुल नवाज, तृतीय तांबटकर, जीक्रा माजीद

स्पोर्टस मीटमध्ये टोपाज, डायमंड, इमरल्ड आणि सफायर या चार हाउसग्रुपमधील खेळाडूंनी विविध स्पर्धांत सहभागी होऊन प्रात्यक्षिक कौशल्य दाखवले.


याशिवाय इतर अनेक खेळांच्या स्पर्धाही घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्पर्धांना रंगत आणली. सर्व विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य युनूस सलीम, उपप्राचार्या फरहाना शेख, संस्थेचे अध्यक्ष अब्दुल रहीम खोकर, उपाध्यक्ष इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, संचालक मंडळ, एस. इंडिया फाउंडेशनचे संचालक तसेच सर्व शिक्षकवर्ग यांच्या हस्ते करण्यात आले.

# अहमदनगर महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर कॉलेज येथे राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब, राष्ट्रीय छात्र सेना, विद्यार्थी कल्याण मंडळ आणि सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. बी. पी. एच. ई. संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस आणि सचिव विशाल बार्नबस यांच्या प्रेरणेने तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



उद्घाटन सोहळ्यात सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँकच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमैया खान, उपप्राचार्य डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, प्रा. दिलीपकुमार भालसिंग, विनानुदानित विभागप्रमुख डॉ. सय्यद रझाक आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या रजिस्ट्रार श्रीमती कल्पलता भिंगारदिवे यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनावेळी श्रीमती भिंगारदिवे म्हणाल्या की, रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असून एका दात्याच्या रक्तामुळे अनेकांचे जीव वाचू शकतात. समाजातील तरुणांनी अशा सामाजिक उपक्रमांत सहभाग घेणे ही काळाची गरज असून , , व विद्यार्थी कल्याण मंडळाचा समन्वय उल्लेखनीय आहे. ''आजचे रक्तदाते हे उद्याचे जीवनदाते आहेत. 'रक्तदान हे महादान' ही भूमिका आपल्या कृतीतून अधिक दृढ होते,'' असे त्यांनी सांगितले. सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँकच्या वैद्यकीय पथकाने सर्व दात्यांची प्रकृती तपासून सुरक्षिततेचे सर्व नियम पाळत रक्तसंकलन केले. शिबिरात एकूण ४७ विद्यार्थ्यांनी आणि स्वयंसेवकांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्तदानानंतर दात्यांना अल्पोपहार देण्यात आला तसेच प्रशस्तिपत्रक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या उपक्रमात , , आणि विद्यार्थी कल्याण मंडळाचे विशेष सहकार्य लाभले. राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ. माधव जाधव, प्रा. झरिना सय्यद, प्रा. अभिषेक सांगळे, प्रा. सीमा तिकोने तसेच विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवला. स्वयंसेवकांनी रांगा व्यवस्थापित करणे, दात्यांना मार्गदर्शन करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली

उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ. भागवत परकाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रविकिरण लाटे यांनी केले.

### अस्वच्छतेमुळे आरोग्य धोक्यात

# नागरी समस्यांनी केडगावकर त्रस्त

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव एकनाथ नगर परिसरातील राधाकृष्ण कॉलनी येथील रस्त्यांची दुरावस्था, ब्लॉक झालेली ड्रेनेज लाईन आणि अत्यल्प दाबाचा पाणीपुरवठा या तिहेरी समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. परिसरातील गंभीर नागरी प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, या मागणीसाठी केडगाव जागरूक मंचाच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.




मंचाचे अध्यक्ष विशाल पाचारणे यांनी आयुक्तांची भेट घेऊन नागरिकांच्या समस्यांची सविस्तर माहिती दिली. अर्चना हॉटेल ते कांदा मार्केट रस्त्यालगतची राधाकृष्ण कॉलनीमधील अंतर्गत रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून खड्डे, उंचवटे आणि तुटलेल्या पृष्ठभागामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. महिलांना, लहान मुलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना या रस्त्यावरून जाणे कठीण झाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या भागातील पूर्वीची ड्रेनेज लाईन पूर्णपणे ब्लॉक झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येत आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. ड्रेनेज लाईनची साफसफाई, दुरुस्ती किंवा आवश्यक असल्यास नवीन लाईन टाकण्याची मागणी मंचाने केली आहे.

याशिवाय, या भागातील पाणीपुरवठा अत्यल्प दाबाने होत असल्याने नागरिकांना चारपाच दिवसांनीच पाणी मिळते, असा आरोप करण्यात आला आहे. अनेकदा तक्रारी करूनही उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. रस्ते, ड्रेनेज आणि पाणीपुरवठा या तिन्ही समस्या गंभीर असल्याने मनपाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका केडगाव जागरूक मंचाने निवेदनात मांडली आहे. प्रशासनाकडून तत्काळ प्रतिसाद न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मंचाने दिला आहे.

# चेतक फेस्टिव्हलमध्ये 'मुसा' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**अहमदनगर । रयत समाचार**

देशातील सुप्रसिद्ध सारंगखेडा अश्व बाजार चेतक फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात अहिल्यानगर येथील गुलशन स्टड फार्मचा सर्व गुणसंपन्न आणि देखणा अश्व 'मुसा' हा घोडा प्रमुख आकर्षण ठरला. उद्घाटन प्रसंगी पणन व राजशिष्टाचार मंत्री तसेच धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी 'मुसा'ची विशेष पाहणी करून त्याच्या देखणेपणाचे आणि प्रशिक्षणाचे कौतुक केले. चेतक फ ेस्टिव्हलचे आयोजक मुन्ना रावल यांनीही 'मुसा'चा जवळून आढावा घेतला. घोड्याचे बांधेबांध्याची वैशिष्ट्ये, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि त्याची स्टॅमिना याबाबत गुलशन उद्योग समूहाचे उद्योजक इम्रान शेख यांच्याशी त्यांनी सविस्तर चर्चा केली. यावेळी मनोज राजे भालसिंग, बाबा आत्तार, रमेश मगर आदी उपस्थित होते.



मुसा'च्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाने, उत्तम शिस्तीने आणि दमदार उपस्थितीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यंदाच्या चेतक फेस्टिव्हलमध्ये 'मुसा'ची उपस्थिती ही सोहळ्याची खास शोभा ठरल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.




दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
- अतिथी संपादक -
सॅम्युअल वाघमारे
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
लेख, माहिती व जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# घोगरगावमध्ये मका नोंदणी; शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात घोगरगाव येथे सुरू झालेली मका नोंदणी ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून संकटातून मार्ग शोधणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उभा राहणारा मोठा आधार ठरत आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई आणि सखुबाई वि. कार्यकारी सेवा सोसायटी यांच्या माध्यमातून राज्य सरकारचा २४०० रुपये प्रती क्विंटल हमीभाव (एमएसपी) जाहीर झाल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी आशा निर्माण झाली आहे.



शेतकऱ्यांना बाजारात योग्य दर न मिळणे, अनियमित पावसामुळे उत्पादनातील तोटा आणि सातत्याने वाढणारा खर्च या समस्यांमुळे शेतकरी हवालदिल आहे. खासगी व्यापाऱ्यांकडून मनमानी दर सांगितले जात असल्याने शासनाचा एमएसपी हा शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा हात ठरत आहे.घोगरगाव येथील जगदंबा डेअरीजवळ सुरू असलेल्या नोंदणी केंद्रावर सकाळपासूनच शेतकऱ्यांची मोठी गर्दी दिसत आहे. ७/१२ व ८अ उतारे, आधार कार्ड, बँक पासबुक आणि मोबाईल नंबर अशा आवश्यक कागदपत्रांसह शेतकरी नोंदणीसाठी येत आहेत. ही नोंदणी फक्त फॉर्म भरण्याची प्रक्रिया नसून भविष्यासाठी आशा निर्माण करणारी धडपड असल्याचे चित्र दिसत आहे.शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून स्वतंत्र बूथची व्यवस्था करण्यात आली असून बाळासाहेब (काका) उगले, प्रवीण डोके आणि वैभव काळे शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांची संयमानं उत्तरे देत आहेत. या टीमचे कार्य केवळ नोंदणीपुरते मर्यादित नसून शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्याचे कामही करत आहे ''बाजारात भाव मिळत नाही; सरकारचा दर मिळाला तर निभेल,'' अशी भावना बहुतेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. यावरून एमएसपी ही योजना केवळ कागदोपत्री राहत नसून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या जीवनात महत्त्वाचा आधार देत असल्याचे स्पष्ट होते.

बाजारभाव कोसळला की शेतकऱ्यांचे उत्पादनच नव्हे तर मनोबलही खालावत असते. अशा वेळी हमीभाव योजना म्हणजे शेतकऱ्याच्या कष्टाला मिळणारा सन्मान. घोगरगावमधील नोंदणी केंद्र हे त्यांच्या लढाईतील एक सुरक्षित आश्वासन बनले आहे.

नोंदणी प्रक्रिया सुरू असून अनेक शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'ड' वर्ग महापालिकेने 'अ' वर्ग दराने कर आकारणी करणे नियमबाह्य- शेख

## अन्यायकारक मालमत्ता करवाढ रद्द करण्याची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेने पाठवलेल्या सुधारित मालमत्ता कर नोटिसांमधील त्रुटी, अवाजवी करवाढ आणि नियमभंगाविरोधात नागरिकांत संताप वाढला असून, वाढीव कर नोटिसा तात्काळ रद्द न केल्यास ता. १९ डिसेंबर रोजी आयुक्तांची गाडी अडवून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी दिला आहे.

सुधारित कर आकारणीमध्ये प्रत्यक्ष पाहणी, तांत्रिक तपासणी किंवा मोजमाप न करता सरसकट वाढ करण्यात आल्याचा नागरिकांचा आरोप आहे. कंत्राटी मोजणी कामगारांकडे तांत्रिक पात्रतेचे कोणतेही पुरावे नसल्याची बाबही समोर आली आहे. अनेक जुन्या घरांनाही अनावश्यक परवानग्या व कागदपत्रांच्या मागण्या केल्या जात असल्याचे शेख मुदस्सर यांनी सांगितले.

मोजमाप, क्षेत्रफळ आणि वापर प्रकारातील विसंगतीमुळे करामध्ये अनाठायी वाढ झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. 'ड' वर्ग महापालिकेने 'अ' वर्ग महानगरपालिकेच्या दराने कर आकारणी करणे हे नियमबाह्य असल्याचा आरोपही करण्यात आला.

मुकुंदनगर भागात पाणीपुरवठ्याची कमतरता, खराब रस्ते आणि मूलभूत सुविधांचा अभाव असताना करवाढ करणे हा नागरिकांवरील दुहेरी अन्याय असल्याचे शेख मुदस्सर यांनी सांगितले. चुकीच्या नोटिसा रद्द करून प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि पुनर्परीक्षणाची मागणी त्यांनी केली. मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन उग्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# वंजारवाडीत कृषिकन्यांचे स्वागत

## शेतकऱ्यांना करणार शेतीचे मार्गदर्शन

**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनईच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नता कार्यक्रमांतर्गत वंजारवाडी येथे दाखल झाल्या. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच महादेव दराडे, उपसरपंच कैलास डोळे, सदस्य रामशिंग झरे, किशोर गिते आणि ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.




या कृषिकन्यांमध्ये संचिता शेटे, श्रद्धा साळुंके, फ्लाविया संसारे, ऋतुजा लोणारी, रोहिणी वळवी आणि मृणाल पवार यांचा समावेश आहे. त्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नव्या शेती पद्धती तसेच विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. कृषिकन्या गावातील प्रत्यक्ष शेती सर्वेक्षण करून शेतकऱ्यांच्या अडचणी, ग्रामीण जीवनमान, सामाजिकआर्थिक स्तर, नैसर्गिक साधनसंपत्ती, पीक पद्धती अशा विविध घटकांचा अभ्यास करणार आहेत. तसेच शेतकऱ्यांसाठी अनेक प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमात माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, पिकांवरील रोग व कीड व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन, शेतीशी निगडित समस्यांचे निराकरण तसेच बीज प्रक्रियेवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. निर्मला विधाते, डॉ. संतोष चौगुले, प्रा. श्रीकृष्ण हुरुळे आणि इतर विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# मानवता संदेश फाउंडेशनची मागणी

## नायलॉन मांजा विक्री खरेदीवर संपूर्ण बंदी घाला

**श्रीरामपूर । रयत समाचार**

मकर संक्रांतीच्या काळात पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. शासनाने नायलॉन मांजाच्या विक्रीवर बंदी लागू केली असली तरी शहरातील अनेक दुकानदारांकडून याची गुपचूप विक्री केली जात असल्याची तक्रार मानवता संदेश फाउंडेशनने केली आहे. माणसे, प्राणी आणि पक्ष्यांसाठी जीवघेणा ठरणारा नायलॉन मांजा तातडीने रोखण्यासाठी नगरपालिका व पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी संस्थेतर्फे करण्यात आली आहे.



दरवर्षी नायलॉन मांजामुळे अनेकांचे प्राण जातात. रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांना मांजामुळे गंभीर दुखापत होऊन मृत्यू ओढवतो. तसेच पक्ष्यांचे पंख अडकून त्यांचा जीव जातो. पतंग उडविताना मुले व तरुण रस्त्यावर बेधुंद धावत असल्याने अपघातांचीही शक्यता वाढते. शहरातील दुकानदारांनी नायलॉन मांजा विक्री न करता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून निरपराध जीव वाचवावेत, अशी मागणी मानवता संदेश फाऊंडेशनने केली आहे.ही मागणी संस्थेचे अध्यक्ष सलीमखान पठाण, उपाध्यक्ष नजीरभाई शेख, सचिव तनवीर शेख, समन्वयक ॲड. समिन बागवान तसेच सदस्य डॉ. सलीम शेख, खालिद मोमिन, सलिम जहागिरदार, ॲड. वाय. के. शेख, डॉ. अफराज तांबोळी, फिरोज पठाण, शकिल बागवान, फय्याज पठाण, बदर शेख, बबलु काझी, हारुन अब्दुल्लाह, सज्जाद हुसैन नवाब, समीरखान पठाण, सलीम रसुल पटेल, जाबिर सैय्यद, शाहरुख काकर, युसुफ लाखानी, जाकिर पटेल, ताजमोहमद काझी, फिरोजखान पठाण, सय्यद जाकिर हुसैन, फिरोज मन्सुरी, शेरखान वेल्डर, अमजद शेख आदींनी केली आहे.

# रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात संपन्न

**पाथर्डी । नितीन गटाणी**

आनंद चेस क्लब, पाथर्डी आणि एस. के. चेस क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा ३० नोव्हेंबर रोजी शहरातील जुने जैन स्थानक येथे मोठ्या उत्साहात पार पडली. तरुण खेळाडूंच्या उपस्थितीमुळे दिवसभर स्पर्धास्थळी उत्सुकता, जिद्द आणि स्पर्धात्मक वातावरण अनुभवायला मिळाले. या स्पर्धेचे उद्घाटन बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी किशोर अशोक रोडी (कुडाळ) यांच्या हस्ते झाले. बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून शिस्त, एकाग्रता आणि निर्णयक्षमता विकसित करणारी कला असल्याचे त्यांनी उद्घाटनावेळी सांगितले. या खेळातून मिळणाऱ्या मूल्यांचा विद्यार्थी आणि पालकांनी आयुष्यात उपयोग करावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. पाथर्डी, शेवगाव आणि परिसरातील खेळाडूंनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध वयोगटातील खेळाडूंच्या रणनीतीपूर्ण व शांतचित्त खेळी पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले. सहभागी खेळाडूंनी दाखविलेली तांत्रिक तयारी आणि परिपक्वता विशेष उल्लेखनीय ठरली. बक्षीस वितरण सोहळ्यास डॉ. विनय कुचेरिया, सचिन कांबळे (संचालक एस. के. चेस क्लासेस), सुभाष भागवत, राजू मेरड, दुर्गा ढोकळे मॅडम, शिंदे मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी मुलांच्या कामगिरीचे कौतुक करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे चीफ ऑर्बिटर पारस मुथा तसेच ऑर्बिटर दुर्गा ढोकळे, संयम खाटेर, आदेश देखणे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले. सूत्रसंचालन व आभार संयम खाटेर यांनी मानले. या स्पर्धेमुळे पाथर्डी आणि परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिबळाविषयी वाढती रुची स्पष्ट दिसून आली. ग्रामीण भागातील मुलांना मेंदूला चालना देणाऱ्या बुद्धिबळासारख्या खेळासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आयोजकांचा हेतू यशस्वी झाल्याचे चित्र स्पर्धेतून दिसून आले.




# पाणीपुरवठा पदभरतीत घोटाळा?

## चौकशी व पुनर्परीक्षेची मागणी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

बेलगाव येथील ग्रामस्थ व परीक्षार्थ्यांनी पाणीपुरवठा पदभरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत चौकशी, दोषींवर कारवाई आणि पुनर्परीक्षेची मागणी केली आहे. या मागण्यांसाठी पंचायत समिती कार्यालयात निवेदन देण्यात आले असून ता. ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आमरण उपोषण सुरू करण्याची चेतावणी देण्यात आली आहे.

निवेदनानुसार, १६ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीत संगणक ज्ञानाची अट वगळल्यामुळे अनेक पात्र उमेदवार वंचित राहिले. ४ नोव्हेंबर रोजी जि. प. प्राथमिक शाळेत झालेल्या परीक्षेदरम्यान ग्रामसेवक आणि सरपंच पती यांनी संगनमताने एका नातलगास मदत केली आणि त्या उमेदवाराला सर्वाधिक गुण मिळवून निवड करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तक्रारी असूनही कोणतीही चौकशी न करता उलट निवड मंजूर करण्यात आल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. परीक्षेदरम्यान शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे ''जाणीवपूर्वक बंद'' ठेवण्यात आल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. तसेच सरपंच पती परीक्षा केंद्रात कोणत्या अधिकाराने उपस्थित होते, हा प्रश्नही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या: भरती प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी, ग्रामसेवक व सरपंच पती यांच्या कारभाराची तपासणी, कथित घोटाळ्यावर गुन्हा नोंदविणे, विद्यमान नियुक्ती रद्द करणे, नव्या भरतीसह संगणक ज्ञानाची अट अनिवार्य करणे, ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याची चौकशी, ग्रामस्थांनी हे निवेदन तहसीलदार, शेवगाव तसेच पोलीस निरीक्षक, शेवगाव यांनाही पाठवले असून प्रकरणाची कायदेशीर तपासणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या निवेदनावर मधुकर पोपळे, अरुण पोपळे, विजय काकडे, योगेश गायके, हरिभाऊ केसभट, संदीप काकडे, संदीप पोपळे, सचिन पोपळे, संतराम पोपळे, कल्याण सुरासे, अक्षय जाधव यांसह ग्रामस्थांच्या सह्या असून ''प्रशासनाने प्रकरण गांभीर्याने न हाताळल्यास आमरण उपोषण अपरिहार्य होईल,'' असा इशारा देण्यात आला आहे.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

# न घेणारे बोटावर मोजण्याइतकेच'




श्रीरामपूर नगरपालिका निवडणूक पार पडली असली तरी तिचे किस्से, अनुभव आणि चर्चा अजूनही सुरूच आहेत. २१ डिसेंबरपर्यंत आणि त्यानंतरही हे किस्से संपणार नाहीत, अशीच परिस्थिती असून दररोज नवे अनुभव समोर येत आहेत. मतदानाची आदली रात्र 'कत्तल की रात' म्हणूनच ओळखली जाते. यंदाही उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी प्रभागातील घराघरांत जाऊन प्रसादाचे वाटप केले. यावेळी त्यांना अनेक वेगवेगळे अनुभव आले. काही ठिकाणी मतदार घरात नसताना त्याच्या 'प्रसादा'ची मागणी कुटुंबीयांकडून होत होती. ''सकाळी येणार आहे, परगावी आहे, आमच्याकडे द्या, आम्ही देऊ'' असे सांगून प्रसाद मिळवण्याचा हट्ट केला जात होता. मात्र उमेदवार आणि त्यांचे समर्थक ''माणूस दाखवा, प्रसाद घ्या'' या भूमिकेवर ठाम राहिल्याने त्यांचा नाईलाज झाला. काही प्रभागांत तर अक्षरशः रांगा लावून प्रसाद घेतला जात होता. त्या रांगेत सर्व स्तरांतील लोक होते. लोकशाहीतील सर्वात मोठे दान मतदान देण्यासाठी प्रसाद घेतो आहोत, याची जाणीवही अनेकांना नव्हती. काही ठिकाणी लोक एकमेकांना घेऊन येत होते, ''नाहीतर आपल्याच नावे टाकतील आणि स्वतः ठेवून घेतील'' अशा टिपण्या करत होते. दिवसा लोकशाही, तत्त्वज्ञान, नैतिकता यांवर मोठमोठे विचार मांडणारीच मंडळी प्रसाद घेताना कोणताही संकोच करत नव्हती, हे पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. एका उमेदवाराला या संदर्भात विचारले असता त्यानेही मनमोकळेपणाने अनुभव सांगितले. त्याला शेवटी विचारले की ''न घेणाऱ्यांची यादी करता येईल का?'' यावर तो हसतच म्हणाला ''हो सर, बोटावर मोजावे इतकेच!'' नगरपालिकेने प्रभागाची विभागणी करताना कोणते मापदंड ठेवले हे प्रशासनालाच ठाऊक. मात्र प्रत्येक विभागात प्रसाद न घेणारे अगदी मोजकेच लोक होते, इतरांनी मात्र 'मागून मागून' घेतला, असे सांगताना त्या उमेदवाराच्या चेहऱ्यावर हसू आणि संताप दोन्ही जाणवत होते.

# शिक्षक महेबूब शेख यांना गुणवंत दिव्यांग पुरस्कार

**अहमदनगर । लक्ष्मण मडके**

शेवगाव येथील इंदिरानगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आणि बालमटाकळी येथील रहिवासी आदर्श शिक्षक महेबूब हुसेन शेख यांनी शारीरिक अडचणींवर मात करत अनेक वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य तत्परतेने पार पाडले आहे. त्यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेतर्फे प्रदान करण्यात येणारा ''दिव्यांग गुणवंत पुरस्कार'' त्यांना अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते देण्यात आला.



या कार्यक्रमात मुख्य वित्त अधिकारी शैलेश मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे योगेश पैठणकर, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दशरथ दिघे, ॲड. सुभाष भोर, माजी सभापती रामदास भोर, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, संजय धामणे, संतोष दुसुंगे, सावली दिव्यांग संघटनेचे बाबासाहेब महापुरे, तालुकाध्यक्ष चाँद शेख, अर्जुन शिरसाट, बाबासाहेब खरात आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते एकूण १८ दिव्यांग शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला.

आदर्श शिक्षक महेबूब शेख यांची पहिली नियुक्ती २५ डिसेंबर २००२ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मी चांदगाव येथे झाली. येथे त्यांनी प्रयत्नपूर्वक विद्यार्थीसंख्या वाढवून एक शिक्षक शाळेचे चार शिक्षकांपर्यंत विस्तार साधला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेले माजी विद्यार्थी राहुल भारत चौधरी आणि अविरत बाबासाहेब अंबेकर आजही ''गुरुजी, आमचे जीवन तुमच्या शिक्षणामुळे उजळले'' असे अभिमानाने सांगतात.

२००९ मध्ये विनंती बदलीने शेख सुकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आले. मुख्याध्यापक पदाचा चार्ज घेतल्यानंतर २०१६ साली त्यांनी शाळेची आकर्षक रंगसजावट केली व परिसरात शैक्षणिक वातावरण निर्माण केले. शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ''पहिली डिजिटल शाळा'' निर्माण करण्याचे श्रेय त्यांनाच जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळे गावातील समाजसहभाग वाढला आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली. आजही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुकळी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखली जाते.

मे २०१८ पासून ते इंदिरानगर मराठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. येथेही त्यांनी वृक्ष लागवड, संवर्धन आणि शैक्षणिक सुधारणा अशी अनेक कामे यशस्वीपणे केली आहेत.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एवढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# ‘चतुरस्त्र’ महाराणी चिमणाबाई गायकवाड

## दि पोझिशन ऑफ वुमन इन इंडियन लाईफ

**भारतातील बहुतांश राजघराण्यातील स्त्रियांचे आयुष्य राजवाड्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. या बाबीला अत्यंत कमी अपवाद आढळतात. बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या दुसऱ्या पत्नी महाराणी चिमणाबाई गायकवाड या अशाच दुर्लक्षित राहिलेल्या स्त्रियांपैकी एक आहेत. सामाजिक सुधारणा, स्त्रियांची उन्नती आणि राष्ट्रवाद याबाबतच्या आपले पती महाराजा सयाजीरावांच्या आंतरिक तळमळीला तितक्याच खंबीरपणे साथ देणाऱ्या चिमणाबाईंचे स्त्रीउद्धाराचे कार्य जाणून घेणे प्रेरणादायी ठरेल.**



सयाजीराव महाराजांच्या पहिल्या पत्नी महाराणी चिमणाबाईंचा ७ मे १८८५ रोजी मृत्यू झाला. त्यामुळे इंदोरजवळील देवास येथे परंपरावादी कुटुंबात जन्मलेल्या गजराबाईंशी (दुसऱ्या महाराणी चिमणाबाई) महाराजांचा दुसरा विवाह २८ डिसेंबर १८८५ रोजी झाला. लग्नावेळी निरक्षर असणाऱ्या चिमनाबाईंच्या व्यक्तिमत्वामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्यात महाराजांचा मोठा वाटा होता. विवाहानंतर चिमणाबाईंनी घेतलेल्या शिक्षणामागे सयाजीराव महाराजांची प्रेरणा होती. परंपरावादी कुटुंबात वाढलेल्या चिमणाबाई विवाहानंतर आधुनिक जीवनप्रणालीचा स्विकार करण्यास सुरुवातीला तयार नव्हत्या. परंतु महाराजांमुळे शक्य झालेले युरोपियन देशांचे दौरे व पाश्चात्य राजघराण्यातील जोडप्यांशी झालेल्या वैचारिक आदान-प्रदानामुळे चिमणाबाईंना स्त्रीशिक्षणाचे महत्व पटले.

स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी आपल्या शारीरिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे याबाबत महाराजांप्रमाणेच त्या आग्रही होत्या. स्वतःच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी चिमणाबाई रोज ७५ मिनिटे चालण्याबरोबरच घोडेस्वारीसुद्धा करत. टेबल टेनिसची आवड असल्याने चिमणाबाई रोज संध्याकाळी टेनिसचे ४ सेट खेळत. चिमणाबाईंबरोबर टेनिस खेळताना बडोदा लष्करात जनरलपदी कार्यरत असणाऱ्या नानासाहेब शिंदेंची दमछाक होत असे. यावरून चिमणाबाईंच्या टेनिस खेळातील कौशल्य व शारीरिक क्षमता यांची आपल्याला प्रचिती येते. महाराजांबरोबर अनेक शिकारी दौऱ्यात उत्साहाने सहभागी होणाऱ्या चिमणाबाईंनी स्वतंत्रपणे वाघ, चित्ता यांसारख्या जंगली जनावरांची शिकार केली होती.



सुरक्षा घोंगडे
वारणानगर
९३७१५०११७३

स्मृतिवार्ता

नवनवीन बाबी शिकण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती असणाऱ्या चिमणाबाईंनी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानातील अनेक कल्याणकारी योजनांमध्ये सक्रीय सहभाग नोंदविला. महाराजांच्या प्रेरणेने विवाहानंतर शिक्षण घेतलेल्या चिमणाबाईंनी स्त्रीशिक्षण प्रसाराचे कार्य करणाऱ्या विविध संस्थांना वेळोवेळी उदारहस्ते आर्थिक साहाय्य केले. मुलींच्या शिक्षणासाठी चिमणाबाईंनी स्वतःच्या खाजगी खर्चातून दरमहा २०० रु. ची तरतूद केली होती. त्याचप्रमाणे बॉम्बे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी महाराणी चिमणाबाईंनी स्वतंत्रपणे १,००,००० रुपयांची रक्कम ठेव म्हणून ठेवली होती.

स्त्रियांबद्दलच्या पारंपारिक धारणा आणि कल्पना दृढमूल असणाऱ्या काळात महाराणी चिमणाबाईंनी पडदा पद्धतीचा त्याग केला. चिमणाबाई पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या राजघराण्यातील पहिल्या महिला होत्या. मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या चिमणाबाईंनी बालविवाहाची रूढी बंद करण्याची मागणी केली होती. महाराजांबरोबर वेळोवेळी भारताबरोबरच युरोप, अमेरिकेसारख्या पाश्चात्य आणि जपानसारख्या पौर्वात्य देशांमध्ये केलेल्या प्रवासात महाराणी चिमणाबाईंना पाश्चात्य स्त्रियांनी उभारलेल्या संस्थांचे अवलोकन करता आले. भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्रियांना शिक्षण देतानाच त्यांच्या कौशल्यांना वाव देणाऱ्या विविध संस्थांची उभारणी करणे आवश्यक असल्याचे चिमणाबाईंचे मत होते. परदेशातील चांगल्या गोष्टींचे अनुकरण करत महाराजा सयाजीरावांनी बडोद्यात उभारलेल्या विविध संस्था आणि राबवलेल्या योजनांचा आदर्श चिमणाबाईंसमोर होता. या आदर्शाचे अनुकरण करत महाराणी चिमणाबाईंनी महाराणी चिमणाबाई लेडीज क्लब (१९०३), श्री चिमणाबाई स्त्रीउद्योगालय (१९१०), महाराणी चिमणाबाई स्त्री समाज (१९१५), कन्या आरोग्य मंदिर (१९१५), मुलींचे महाराणी हायस्कूल (१९०७), भगिनी समाज (१९२१), महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा (१९२३), महाराणी चिमणाबाई प्रसूतिगृह आणि शिशूकल्याण संस्था (१९२३), महिला क्रीडा मंडळ (१९३७) या संस्थांच्या स्थापनेत महत्वपूर्ण भूमिका बजावत स्त्रियांना स्वतःच्या उन्नतीसाठी विविध क्षेत्रे खुली करून दिली. संस्थेची स्थापना करण्याबरोबरच तिच्या वाढीसाठी आवश्यक सोई-सुविधा काटेकोरपणे पुरविण्याची महाराजांची पद्धत महाराणी चिमणाबाईंनीदेखील अवलंबली. महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेस चिमणाबाईंकडून ६,००० रु. वार्षिक अनुदानाची तरतूद करण्यात आली होती. स्त्री-उन्नतीसाठीच्या विविध प्रयत्नांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवणाऱ्या महाराणी चिमणाबाई स्त्री-पुरुष समानतेसाठी विशेष आग्रही होत्या. सैनिकी खात्याच्या ‘कवायती फौजे’संदर्भातील सेक्शन ९५ नियमामध्ये राजघराण्यातील व्यक्ती व इतर सन्माननीय व्यक्तींना त्यांच्या श्रेणीनुसार विविध समारंभप्रसंगी द्यावयाच्या अंगरक्षकांची संख्या निर्धारित करण्यात आली होती. त्यानुसार महाराणी व युवराज यांना ३२ स्वारांचा मान देण्यात आला होता. परंतु समानतेच्या तत्वानुसार विविध समारंभांप्रसंगी महाराजांइतकेच अंगरक्षक आपल्याला मिळावेत, अशी मागणी करतानाच चिमणाबाईंनी अंगरक्षकांची ही संख्या कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आली याचीदेखील माहिती मागवली. १९०४ मध्ये बडोद्याच्या दिवाणांनी मंजूरी दिलेल्या सैनिकी खात्याच्या टिपणात सर्वप्रथम अंगरक्षकांची ही संख्या निर्धारित करण्यात आली होती. पुढे महाराजांच्या आदेशानुसार प्रकाशित झालेल्या ‘कवायती नियमां’त हीच संख्या कायम ठेवण्यात आली. महाराणी चिमणाबाईंची समान अंगरक्षकांची ही मागणी अमान्य करण्यात आली असली तरी यातून चिमणाबाईंचा स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह यातून स्पष्ट होतो

महाराजांच्या मृत्युनंतर ब्रिटीश सरकारने पत्रात केलेल्या Dowager (विधवा) महाराणी या उल्लेखावर आक्षेप नोंदवत, असा उल्लेख न करण्याची विनंती चिमणाबाईंनी केली होती. त्यांची ही मागणी ब्रिटीश सरकारकडून मान्य करण्यात आली. १९११ मध्ये भारतीय स्त्रियांच्या स्थितीचे जगातील ७ खंडातील २९ देशांमधील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करणारा महाराणी चिमणाबाई लिखित The Position of Women in Indian Life हा भारतीय स्त्रियांना अर्पण केलेला ग्रंथ लंडनमधून प्रकाशित झाला होता. हा ग्रंथ म्हणजे सयाजीराव महाराजांच्या प्रेरणेने विकसित झालेल्या चिमणाबाईंच्या व्यक्तिमत्वाचा परमोच्च बिंदू होता. स्त्रियांना आत्मसन्मानासह सक्रिय सामाजिक सहभागासाठी काय करायला हवे , याचा जागतिक परिप्रेक्ष्यात विचार करणारा जगातील हा एकमेव ग्रंथ आहे. तर जगातील स्त्रियांच्या स्थितीशी भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना करून लिहिलेला हा आजखेरचा एकमेव ग्रंथ आहे. या ग्रंथाचे लेखन चिमणाबाईंनी एस.एम. मित्रा या विद्वानाच्या सहकार्याने केले होते

सार्वजनिक जीवनातून स्त्रियांना वगळले जाण्याची कारणमीमांसा करतानाच त्यावरील उपाययोजना कशा प्रकारे लागू करता येतील याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न चिमणाबाईंनी या ग्रंथात केला आहे. भारतातील अनेक प्रगतशील योजनांच्या अपयशाचे मुख्य कारण या योजनांमधील स्त्रियांचा अत्यल्प सहभाग हे असल्याचे प्रतिपादन चिमणाबाईंनी केले आहे. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होवून कल्याणकारी सामाजिक कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांना उपयुक्त अनेक व्यावहारिक सूचना चिमणाबाईंनी या ग्रंथात केल्या आहेत. पडदा पद्धतीच्या परंपरावादी काळात स्त्रियांनी कृषी, कला, कारागिरी, लोकोपयोगी सेवाकामे, हॉटेल व्यवसाय इ. आर्थिक व्यवसायांशी परिचित होवून त्यांचा स्वीकार करतानाच बौद्धिक क्षेत्रसुद्धा स्त्रियांनी आपलेसे केले पाहिजे, अशी इच्छा या ग्रंथाच्या माध्यमातून त्या व्यक्त करतात.

जगातील ७ खंडातील २९ देशांतील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करत स्वातंत्र्याप्राप्तीच्या आधी ३७ वर्षे भारतीय स्त्रियांच्या उत्कर्षाचा ‘मार्ग’ आखून देणाऱ्या या एकमेव ग्रंथाचा वाङ्मय कोशामध्ये साधा उल्लेखसुद्धा नसणे ही मराठी साहित्य क्षेत्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. १८८२ साली ताराबाईंनी ‘स्त्रीपुरुषतुलना’ हा स्फोटक निबंध लिहून स्त्री शोषणाचा अध्याय लिहिला. त्यानंतर २७ वर्षानी या ग्रंथाद्वारे चिमणाबाईंनी स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा महामार्ग आखला होता. आजच्या स्त्रीवादी साहित्याला आत्मचिंतनाकडून आत्मटीकेकडे घेऊन जात असताना पुरुष द्वेषाची बाधा होऊ न देता समतावादी आणि प्रत्येक कालखंडात सुसंगत असा कृतिकार्यक्रम म्हणजे हा महाग्रंथ आहे. हे पुस्तक स्त्रियांसाठी बायबल समान आहे. परंतु दुर्दैवाने स्त्रीमुक्ती चळवळीच्या इतिहासाने, इतिहास अभ्यासकांनी आणि महाराष्ट्राने आजअखेर महाराणी चिमणाबाईंची व त्यांच्या या ग्रंथाची दखल घेतली नाही.

सयाजीराव महाराजांच्या ‘वाटेने’ मार्गक्रमण करत स्त्री-उन्नतीसाठी कार्यरत राहिलेल्या महाराणी चिमणाबाईंना ३ ऑगस्ट १८९२ रोजी ब्रिटीश महाराणींनी "Emperial Order of the Crown of India' या किताबाने सन्मानित केले. १९०६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेतील महिला विभागाच्या अध्यक्षा म्हणून चिमणाबाईंची निवड करण्यात आली होती. तर १९२७ मध्ये पुण्यात भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय महिला परिषदेचे अध्यक्षपद त्यांना सन्मानपूर्वक देण्यात आले होते.१९२९ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचे ‘तौलनिक भाषाशास्त्र’ या विषयावरील भाषण बडोद्यातील सहविचारिणी सभेने आयोजित केले होते. या भाषणाचा वृत्तांत वर्तमानपत्रात वाचून महाराणी चिमणाबाईंनी विठ्ठल रामजी शिंदे यांना चर्चेसाठी बोलावले. यावेळी चिमणाबाईंनी रशियातील कम्युनिझम या विषयावर आपल्याशी चर्चा केल्याचा संदर्भ शिंदे यांनी त्यांच्या ‘माझ्या आठवणी व अनुभव’ या आत्मचरित्रात नोंदविला आहे. ज्याकाळात भारतात कम्युनिझम हा विषय नुकताच चर्चेत आला होता त्याकाळात एक मराठी राणी कम्युनिझमसारख्या गंभीर विषयांत रुची ठेवते यातच महाराणी चिमणाबाई यांचे बौद्धिक क्षेत्रातील अनन्य स्थान स्पष्ट होते. फक्त महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला भूषण असणाऱ्या या महान परंतु अज्ञात राणीचे निधन २३ ऑगस्ट १९५८ रोजी पुणे येथे झाले.

(लेखिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इतिहास विषयात पीएचडी करत आहेत)

# शहराचा पद्यरूप इतिहास ही अभिनव संकल्पना- वर्षा उसगावकर

## ‘पिंपरी चिंचवड वैभव’चा दिमाखदार प्रकाशन सोहळा संपन्न

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

‘पिंपरी चिंचवड वैभव’ या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून शहराचा पद्यरूप इतिहास मांडण्याची ही अतिशय अभिनव व प्रेरणादायी कल्पना आहे, अशा शब्दांत मराठी अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी प्रशंसा केली. पिंपरी-चिंचवड शहराच्या समृद्ध इतिहासाचा कवितांमधून वेध घेणाऱ्या या काव्यसंग्रहाचे प्रकाशन निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर प्रेक्षागृहात बुधवारी ता. ०३ डिसेंबर २०२५ रोजी पार पडले.महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याला साहित्य, कला, शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान अ.भा. मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी भूषवले. मंचावर भाऊसाहेब भोईर, राजन लाखे, डॉ. अभय कुलकर्णी, प्रा. डॉ. अशोक पगारिया, प्रभाकर ओव्हाळ, मनीषा पवार, कांचन जावळे, सुषमा जावळे आणि संभाजी बारणे उपस्थित होते.यावेळी उसगावकर म्हणाल्या, गायकाचा सूर लागला की मैफल रंगते; अगदी तशीच सुरुवातीच्या नृत्य-गायनातून उभ्या राहिलेल्या वातावरणाने हा प्रकाशन सोहळा अधिकच रंगत गेला. पूर्वी मला कवितांची भीती वाटायची; पण ‘कविता म्हणजे जीवनाचे सत्त्व’ हे समजल्यावर मी कवितांची चाहती झाले. या संग्रहात सहभागी झालेल्या सर्व ९६ कवींचे मन:पूर्वक अभिनंदन.



प्रास्ताविकात राजन लाखे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शाखा ही ३५ वर्षांची परंपरा लाभलेली आणि दोन वेळा राज्यातील सर्वोत्तम शाखा म्हणून गौरवलेली संस्था आहे. शहराचा इतिहास कवितेतून शब्दबद्ध करण्याची संकल्पना संभाजी बारणे यांनी मांडली, आणि त्याला शहरातील कवींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १५२ कवींमधील निवडक ९६ कवींच्या रचना या संग्रहात समाविष्ट आहेत.

अध्यक्षीय भाषणात डॉ. जोशी म्हणाले, भौतिक विकासापेक्षा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक ही शहराची खरी श्रीमंती आहे. पिंपरी-चिंचवडला भोजापूरच्या रूपाने दोन हजार वर्षांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. ‘पिंपरी चिंचवड वैभव’ हा काव्यसंग्रह या सांस्कृतिक वैभवाचा दर्पण आहे.

ज्येष्ठ लेखिका कै. विनीता ऐनापुरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर प्रा. सुरेखा कटारिया, डॉ. अकिला इनामदार, कमल सोनजे, माधुरी डिसोजा, मंगला पाटसकर, प्रा. सुभाष आहेर, डॉ. नीलकंठ मालाडकर, सीताराम नरके, रमेश पिंजरकर यांचा सन्मान करण्यात आला. फिरोज मुजावर यांनी सादर केलेल्या गणेशवंदनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुनीता बोडस, किरण लाखे, नीलिमा फाटक यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर,
१४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा
अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

# ‘माणुसकीची अंत्ययात्रा’ कवितासंग्रहाचे ७ डिसेंबरला प्रकाशन

**मुंबई । भूषण तांबे**

नवी मुंबईतील प्रतिभावान कवी प्रदीप बडदे लिखित ‘माणुसकीची अंत्ययात्रा’ या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाचा भव्य प्रकाशन सोहळा रविवारी ता. ७ डिसेंबर रोजी सायं. ४.३० वाजता कोपरखैरणे (पश्चिम) येथील ज्ञानविकास शाळेच्या मुख्य सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.मानवी मूल्यांच्या शोधयात्रेला स्पर्श करणाऱ्या या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन कार्यक्रमात साहित्यविश्वातील मान्यवरांची उपस्थिती विशेष ठरणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष म्हणून वर्ल्ड व्हिजन टाईम्स, मुंबईचे संस्थापक आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व प्रा. नागेश हुलवळे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या विचारमंथनाची संधी रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. त्याचप्रमाणे अलिबागचे शिक्षक व निवेदक प्रा. अजित हरवडे, रायगड शिवसह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक चंद्रकांत जोरकर, नवी मुंबई साहित्य परिषदेच्या कार्यकारी सदस्या कल्पना देशमुख आणि प्रा. ऋतुजा गवस या मान्यवर पाहुण्यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवाकवी व योग प्रशिक्षक अनुकूल माळी सांभाळतील. प्रकाशन सोहळ्यासाठी ॲड. शंकर बडदे व ज्ञानविकास शाळेचे शिक्षक संतोष जाधव यांनी सहकार्य केले आहे.‘माणुसकीची अंत्ययात्रा’ या काव्यसंग्रहातून आधुनिक समाजातील मानवी भावनांचे विविध पैलू उलगडत असल्याने प्रकाशन सोहळ्याची साहित्यरसिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

